प्रेस नोट

भुसावळ बाजारपेठ पो. स्टे.
दिनांक -03/04/2026

-

प्रती,

--------------------------------

--------------------------------

विषय- एक गावठी पिस्टलसह आरोपी भुसावळ बाजारपेठ पोलीस स्टेशन डी.बी.पथकाकडुन जेरबंद

मा. पोलीस अधिक्षक जळगाव श्री.महेश्वर रेड्डी , अप्पर पोलीस अधिक्षक श्री. अशोक नखाते, तसेच उप विभागीय पोलीस अधीकारी भुसावळ भाग भुसावळ श्री. केदार बारबोले यांनी भुसावळ शहरात गावठी पिस्टल (गावठी कट्टे) बाळगणारे आरोपी बाबत माहिती काढुन अवैध शस्त्रे बाळगणारे आरोपी चेक करुन त्यांचे हालचाली वर लक्ष ठेवुन त्यांचेवर कारवाई करुन प्रतीबंध करण्याचे आदेश दिले होते त्याप्रमाणे पोलीस निरीक्षक श्री. राहूल वाघ यांचे मार्गदर्शनाखाली भुसावळ बाजारपेठ पो. स्टे. चे डी. बी. पथकातील पो उपनिरीक्षक राजु सांगळे, म.पो.उप.निरी. भारती काळे, पो.हे.कॉ./ 2692 विजय नेरकर, पोहेकॉ 3077 कांतीलाल केदारे, पोकॉ 272 भुषण चौधरी, पोकॉ 1817 अमर अढाळे, पो.कॉ. 293 योगेश माळी पो.कॉ. 2820 सचिन चौधरी, पो.कॉ. 611महेंद्र पाटील, पोकॉ 2053 प्रशांत सोनार, पोकॉ 279 जिवन कापडे, पोकॉ 1980 दिलीप कोल्हे पो.कॉ. 2342 चंद्रकात रायपुरकर पो.कॉ. 59 जावेद शहा पो.कॉ. 710 हर्षल महाजन अशांना माहिती काढुन कारवाई करुन प्रतीबंध करण्या बाबत कळविले होते त्यावरुन आम्हाला गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की भुसावळ शहरातील श्रीराम नगर भागात श्रीराम मंदीरा जवळ एक इसम हा कोणतातरी गंभीर गुन्हा करण्याच्या उद्देशाने त्याच्या कब्जात गावठी पिस्टल (गावठी कट्टा घेवुन आलेला आहे अशी बातमी मिळाल्याने मा. पोलीस निरीक्षक राहुल वाघ यांनी खात्री करुन कारवाई करणे बाबत आदेश दिल्याने डी. बी. पथकातील वरील अधिकारी व अंमलदारांनी भुसावळ शहरातील श्रीराम नगर भागात श्रीराम मंदीरा जवळ जावुन बातमी प्रमाणे वर्णनच्या इसम नामे संदीप सुनिल जाधव वय 23 रा.कुमावत नगर, सहजयश अपार्टमेंट प्लॉट नं.303 मखमलाबाद रोड, पंचवटी नाशीक यास ताब्यात घेवुन त्याची अंग झडतीत एक 20,000/- रुपये किंमतीचा लोखंडी गावठी पिस्टल मॅगझीनसह,1000/- रुपये किंमतीचे एक जीवंत काडतुस मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन गु.र.नं.162/2026 आर्म अॅक्ट 3/25 सह म.पो.का. कलम ,(1)37 135 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे . उप विभागीय पोलीस अधीकारी भुसावळ भाग भुसावळ श्री. केदार बारबोले व पोलीस निरीक्षक श्री. राहूल वाघ यांचे मार्गदर्शनाखाली गुन्ह्याचा पुढील तपास पोहेकॉ/2692/विजय बळिराम नेरकर हे करत आहेत.

Scanned with OKEN Scanner

